# विज्ञान भारतीचे ध्येय व उद्दिष्ट

प्रगत विज्ञान व तंत्रज्ञानाने लाभलेली ऐहिक समृद्धी आणि जीवन सफल करणारे परिपूर्ण तत्वज्ञान हे प्राचीन भारताचे वैभव आहे त्याचे आणखी वैशिष्ट्य म्हणजे हे विज्ञान व तंत्रज्ञान वा तत्वज्ञान १४ विद्या व ६४ कला मार्फत समाजात समाजाच्या तळागाळात झिरपलेले मुरलेले होते समाजजीवनात प्रतिबिंबित होणाऱ्या त्या वैभवाची पुनःस्थापना करणे हे विज्ञान भारतीचे ध्येय आहे.

**विज्ञान भारतीची कटिबद्धता**

हे ध्येय साध्य करण्यासाठी वैज्ञानिक, तंत्रज्ञानी , तत्त्वज्ञ, विद्यावंत आणि कलावंत व समाजातील प्रत्येक व्यक्ती यामध्ये सेतु उभारण्यास विज्ञान भारती कटिबद्ध व तत्पर आहे. यासाठी विविध भारतीय विद्या व कला यामधील सुप्त विज्ञान, तंत्रज्ञान व तत्वज्ञान यांना पुनःसन्मान व झळाळी देऊन त्या प्रवाही करण्यासही विज्ञान भारती प्रयत्नशील आहे.

१) देशातील महत्त्वाच्या राष्ट्रीय संशोधन संस्था व प्रयोगशाळा यात कार्यरत असलेल्या वैज्ञानिक व तंत्रज्ञानी यांनी स्वदेशास उपयुक्त असलेल्या विज्ञान व तंत्रज्ञानाच्या विकासावर भर द्यावा आणि असेच संशोधन समाजाच्या सर्व स्तरावर पोहोचवावे यावर विज्ञान भारतीचा विशेष भर आहे. त्यास राष्ट्रीय संशोधन संस्थांचेही चांगले सहकार्य लाभत आहे.

२) भारतीय ज्ञानवंत जगभर विखुरलेले असून जागतिक विज्ञान व तंत्रज्ञानाच्या विकासात बहुमूल्य योगदान देत आहेत. त्यांची आपल्या भूमीबद्दलची व संस्कृतीची आस्था लक्षात घेऊन आपापल्या कर्मभुमीत राहुनसुद्धा भारताच्या अभ्युदयासाठी त्यांना संधी उपलब्ध करून देण्यासाठी एक सशक्त व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात विज्ञान भारतीने पुढाकार घेतला असून, त्यालाही जगभरातील भारतीयांकडून उत्तम प्रतिसाद मिळत आहे. यामुळे देशाच्या प्रचलित व प्रमुख समस्यांवर चिंतन व चर्चा याद्वारे उपाययोजनांचा शोध घेता येऊन, या ज्ञानवंतांच्या अनुभवाचा फायदा प्रत्यक्षात लवकरच दिसू लागणे अपेक्षित आहे.

३) वैज्ञानिक दृष्टीकोन,शास्त्रीय निरीक्षणे, विश्लेषण आदींच्या व्यापक प्रसारामुळे प्राचीन भारतीय विज्ञान व तंत्रज्ञान सर्व जगात अग्रेसर होते. सतराव्या शतकात मांडले गेलेले गणित व भौतिकशास्त्र यातील बरेचसे सिद्धांत वैदिक कालखंडात भारतीय ऋषींनी व साधकांनी मांडले होते. या उज्ज्वल भारतीय विज्ञान परंपरेची ओळख व त्याचा सार्थ अभिमान सध्या लुप्त झाला असून छद्मविज्ञान डोके वर काढीत आहे. या छद्मविज्ञानास छेद देऊन कणाद, सुश्रुत, ब्रह्मगुप्त, आर्यभट्ट, पतंजली, वराहमिहीर आदी अनेक भारतीय संशोधकांच्या कार्याची ओळख विद्यार्थीदशेतच करून देण्यासाठी विज्ञान भारती विशेष प्रयत्न करीत आहे.

४) स्थापत्य, वास्तुशास्त्र, नगररचनाशास्त्र, वनीकरण, पर्यावरण रक्षण व संवर्धन, मंदिरशास्त्र, शिल्पशास्त्र, आदी अनेक शास्त्रांचा भारतीय संशोधकांनी उपयोजनात्मक अभ्यास करून सर्वसामान्य जनांच्या जीवनाशी समन्वय घडवून आणला होता. त्यावर अधिक संशोधन करण्यासाठी नवीन पिढीला प्रेरणा देण्याचे त्यासाठी सर्व सुविधा उपलब्ध करून देण्याचे, व शिष्यवृत्त्या देऊन प्रोत्साहित करण्याचे कार्य विज्ञान भारती करीत आहे.

५) नृत्य–नाट्य –संगीत आदी जीवन समृद्ध करणाऱ्या कला भारतीय प्रगत विज्ञानाची साक्ष देणाऱ्या आहेत.

त्यामागील तत्वज्ञान तर हे भारतीय कलाकार प्रत्यक्ष अनुभवत आहेत. त्यातील सुप्त व प्रगल्भ विज्ञानास दाद देऊन जनसामान्यांपर्यंत हे विज्ञान पोहोचावे यासाठीही विविध उपक्रम विज्ञान भारती करीत असते.

६) आयुर्वेद हा भारतीयांचा जणू पाचवा वेद याची महती तर आता सर्व जग जाहीर झाली असून जगभरातील अनेक राष्ट्रांनी ही जीवनपद्धती अंगिकारण्यास प्रारंभ केला आहे भारतीय विज्ञानाची ही फार मोठी उपलब्धी आहे यासाठी पारंपारिक आयुर्वेदिक तत्वज्ञानावर आधारित वैद्यकीय संशोधन, शिक्षण, औषध निर्मिती, औषधी वनस्पती संगोपन–संशोधन–संवर्धन, साहित्य निर्मिती, उपचारपद्धती आदी विषयांच्या अभ्यासासाठी विज्ञान भारतीने स्वतंत्र व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे.

७) वनवासी, आदिवासी, पारंपरिक ग्रामीण कलाकार, शेतकरी, कामकरी हे जरी आधुनिक विज्ञान व परंपरा जाणत नसले, तरीही प्राचीन ज्ञान विज्ञान यांचे अंशतः रक्षण करीत आहेत. त्यांच्या सहजक्रियांमध्येही हे विज्ञान दडलेले आहे. या विज्ञानाची जाणीव त्यांना करून देणे, त्यावर संशोधन करण्यास त्यांना प्रोत्साहन देणे, संस्कार करून या व्यवस्था आत्मनिर्भर करणे, नागरी जीवनाशी त्यांचा समन्वय घडवून आणणे हे कार्यही विज्ञान भारती ने हाती घेतले आहे.

८) आजचे विद्यार्थी हे उद्याच्या भारताचे आधारस्तंभ आहेत. त्यांना घडविण्यात शिक्षकांचा फार मोठा सहभाग आहे. म्हणून शिक्षकांचे सक्षमीकरण आवश्यक मानून शिक्षक – प्रशिक्षणासाठी विज्ञान भारती अग्रक्रम देत असून यासाठी अनेक उपक्रम राबवित असते.

तर प्रत्यक्ष विद्यार्थ्यांनी वैज्ञानिक दृष्टिकोन जोपासावा यासाठी व देशाच्या गरजेनुसार आधुनिक विज्ञान शाखांमध्ये प्रगती साधण्यासाठी त्यांना प्रेरणा देणे, संशोधनासाठी प्रवृत्त करणे, त्यासाठी सर्व सुविधा उपलब्ध करून देणे हेही विज्ञान भारतीचे धोरण आहे. युवा वैज्ञानिकांची संख्या वाढवणे यासही विज्ञान भारती प्राधान्य देत आहे.

९) भारतीय प्रादेशिक भाषांमधून विज्ञान साहित्याची निर्मिती, नव – संकल्पांचे सादरीकरण यास प्रोत्साहन देण्याचे कार्यही विज्ञान भारती करीत असते. भारतीय वैज्ञानिकांची चरित्रे प्रसिद्ध करणे, त्यांचे विज्ञानातील योगदान अधोरेखित करणे, अशा पुस्तकांचे प्रकाशन करणे यात विज्ञान भारतीचा हातभार असतो.

१०) देशाच्या सर्वांगीण विकासासाठी महिलांचा सहभाग असावयास हवा याबाबत दुमत असू शकत नाही, या उद्देशाने विज्ञान भारती ने ''शक्ति'' ही स्वतंत्र महिला संघटना अखिल भारतीय स्तरावर स्थापन केली आहे. हा विभाग महिलांच्या सामाजिक सृजनात्मक सशक्तीकरण यावर भर देत विज्ञान, तंत्रज्ञान, आरोग्य व उद्योजकता अशा माध्यमातून कार्य करतो.

थोडक्यात १९९१ स्थापन झालेली विज्ञान भारती ही स्वयंसेवा स्वयंसेवी संस्था, विज्ञान आणि तंत्रज्ञान यांच्या आधाराने भारताचा सर्वांगीण विकास साधण्याचा संकल्प करून कार्य करीत आहे. प्राचीन भारतीय विज्ञान शाखांची उज्वल परंपरा आणि आधुनिक विज्ञान यांची शास्त्रशुद्ध सांगड घालीत स्वदेशीच्या तत्त्वांशी समन्वय साधून ही वाटचाल सुरू आहे. हे जाळे आता देशभरातील २८ राज्यांमध्ये आणि ७ देशात विस्तारले आहे.

या वाटचालीत सर्वांनी सहभागी व्हावे व आपला हातभार लावावा असे विज्ञान भारतीचे आवाहन आहे !

११) पारंपारिक भारतीय तत्त्वज्ञान हे सैद्धांतिक व प्रायोगिक स्तरावर सिद्ध झालेले व शाश्वत सत्यमूल्यांचे ज्वलंत उदाहरण आहे. मात्र आधुनिक विज्ञानाची परिभाषा त्याहून अत्यंत भिन्न असल्याने हे पारंपारिक तत्वज्ञान नव्या प्रचलित वैज्ञानिक परिभाषेत मांडण्याचे काम पुढील वाटचालीत करावयाचे आहे.

◆

**डॉ. क. कृ. क्षीरसागर**
nanahema10@gmail.com